# स्वयंसहाय्यता समूह (Self Helf Groups/SHG)

**१) पार्श्वभूमी :-** दारिद्र्य (गरीबी) निर्मूलनाचे अनेक कार्यक्रम आले. गरीबी हटाव ची घोषणाही झाली. परंतू यातू-न फारसे -िष्पन्न झाले नाही असेच चित्र आहे. याचा अर्थ गरीबांची गरीबी घालवण्यासाठी आर्थिक मदत देवून हे काम साध्य होणारे नाही हे आजवर झालेल्या प्रयत्नाबाबत दिसून येते. यासाठी स्वयंसहाय्यता समूह हाच पर्याय योग्य आहे. अन्य कूणी आपला विकास करण्यापेक्षा स्वतःच स्वतःला मदत करुन विकास साधायला प्रत्यय देणारा मार्ग व व्यक्तिकडून समविष्टकडे जाणारी वाट म्हणजे एसएचजी.

**२) सं ल्प-ाा :-** स्वयंसहाय्यता बचत गट हे गरीब लोकांचे छोटे छोटे गट असतात. गटातील सभासद एका समान आर्थिक परिस्थितीचा सामना करतात ते आपल्या अडीअडचणीच्यावेळी एकमेकांना, परस्परांना त्यांचे जमा बचतीतून आर्थिक सहाय्य करतात. गटातील सदस्यांची आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी स्वतःचे बीज भांडवल तयार करतात. सामाजिक प्रश्नासंबंधी विचार करतात व योग्य ती मदत करतात. संघटीत स्वरोजगाराची शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी परस्परांना सहकार्य करतात. अशा प्रकारे समूहाचे व स्वतःचे उन्नतीसाठी एकत्रित झालेल्या व्यक्तिंच्या समूहाला स्वयंसहाय्यता गट असे म्हणता येईल.

**३) कार्यपध्दती :-** स्वयंसहाय्यता गटाच्या कार्यपध्दतीतील महत्वाचा आणि कळीचा मुद्दा कोणता असेल तर आधी बचत मग कर्ज. गटामधील सदस्य एकमेकांना छोटी छोटी बचत करण्यासाठी प्रेरित करतात व स्वतःची ठरविलेली बचतीची रक्कम घेवून एकत्र बसतात व बचत संकलित (जमा) करतात. गटातील सदस्यापैकी गरजू सभासद कर्जाची मागणी करतात. अशा कर्जास अंतर्गत कर्ज म्हणतात यासाठी कारण विचारले जात नाही आणि तारण घेतले जात नाही. सभासदाची बचत आणि गटातील पत हीच त्यास तारण असते. असे कर्ज (आर्थिक सहाय्य) देण्याबाबत सामुदाईक निर्णय घेतले जातात याशिवाय अडीअडचणीच्या, दुःखाच्या प्रश्नावर चर्चा इतर विषयावर गप्पा होतात. याशिवाय काही उपक्रम हाती घेण्याबाबत चर्चा होवून कार्यवाही ठेवली जाते. स्वयंसहाय्यता गटाचे मार्गक्रमण निर्मिती, क्षमता, संवर्धन व आर्थिक व्यवसाय करणे या टप्प्यानुसार होते.

शासन, राष्ट्रीय बँक व राज्य सहकारी बँकेच्या मार्गदर्शक सूचनांचा अनुसरुन सन १९९९-२००० या आर्थिक वर्षापासून बँकेने स्वयंसहाय्यता गट निर्मिती करुन त्यांचे संगोपन करणे, देखभाल करणे, आर्थिक सहाय्य व सुविधा उपलब्ध करुन देणेचे धोरण स्विकारले आहे.

ए.पी.एल. च्या गटांमध्ये सभासदाची संख्या कमीत कमी १० व जास्तीत जास्त २० सदस्यांचा समावेश/असावा, अपंग व्यक्तिच्या बाबतीत ५ सदस्यांचा गट चालू शकतो, ए.पी.एल. च्या गटांना बचतीच्या प्रमाणांत कर्ज पुरवठा केला जातो. १:१ प्रमाणांत गटांना रु.१५,०००/- मात्र कर्ज दिले जाते. परंतू एखाद्या गटाची जमा बचत रु.१५,०००/- पुढे रक्कम असेल तर त्या गटास बचतीचे प्रमाणांत कर्ज दिले जाते. त्यानंतर बचतीच्या प्रमाणांत १:२, १:३ व १:४ प्रमाणांत कर्ज पुरवठा ११% व्याजदराने केला जातो. जास्तीत जास्त कर्ज कमाल मर्यादा रु.३.०० लाख मात्र केला जातो.

एन.आर.एल.एम. (राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोनती अभियान):- दारिद्र्य रेषेखालील बचत गटाचे सदस्य हे शासनाने घोषीत केलेल्या बी.पी.एल. यादीतील नंबर धारण करणारेच असावेत. मग ते कोणत्याही जात धर्माचे चालतील तथापि, सामाजिक समानता गरजेची आहे. या गटांमध्ये १ ते १० महिला सदस्यांचा समावेश असावा.

बँकेकडून केल्या जाणाऱ्या कर्ज पुरवठ्याचे धोरण पहिले कर्ज गटांच्या बचतीच्या प्रमाणांत ७ ते ८ पट किंवा रु.५०,०००/- यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमेपर्यंत कर्ज वाटप करता येते.

दुसरे कर्ज - पहिले कर्ज परतफेड झालेल्या दशसुमी पात्र गटांना दुसरे कर्ज गटांस बचतीच्या प्रमाणांत ५ ते १० पट किंवा रु.१.०० लाख यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमेपर्यंत कर्ज वाटप करता येते.

तिसरे कर्ज - दुसरे कर्ज परतफेड झालेल्या गटांना व्यवसायासाठी तिसरे कर्ज प्रकल्प आराखड्यानुसार (प्रोजेक्ट रिपोर्ट) जास्तीत जास्त रु.३.०० लाख मात्र देता येते. कर्ज परतफेडीचा ज ालावधी ३ वर्षाचा राहील.

बँकांना व्याज अनुदान - या अभियानातंर्गत ७०% दारिद्र्ये रेषेखाली सदस्य असलेल्या गटांना कर्जावरील व्याजाचे अनुदान देय राहील. या सर्व कर्जाचा बँक व्याज दर (पहिले, दुसरे, तिसरे) १२.५०% राहील. जे गट नियमित कर्जाची परतफेड करतील अशा गटांना ७% वरील व्याज अनुदान मिळणार आहे. बँक व्याज दर व ७% व्याजदर यातील ५.५०% प्रमाणे फरकाची रक्कम व्याज अनुदान स्वरुपात गटांच्या सेव्हिंग्ज खाती वर्ग केली जाणार आहे. व्याज अनुदान रु.३.०० लाखाचे वरील घेतलेल्या कर्जाला १२.५०% प्रमाणे व्याज आकारणी राहील.

सध्या बँकेकडे माहे सप्टेंबर २०१७ अखेर ए.पी.एल. गट २०१५२ व बी.पी.एल./एन.आर.एल.एम. गट ३४८१ असे एकूण २३६३३ गट आहेत. त्यामुळे स्वयंसहाय्यता गटांमध्ये २९०८६५ महिला समाविष्ट झालेल्या आहेत. बँकेकडे प्रत्येकीचे सेव्हिंग्ज खाते उघडणे आले आहे. त्यामुळे बँकेला प्रत्येकी महिलेच्या सेव्हिंग्ज खात्यामुळे सरासरी रु.२००/- प्रमाजे लो-कॉस्ट डिपॉझीट मिळालेले आहे. त्यांचेकडील गोळा केलेला स्वनिधी रु.१११५७.३६ मात्र जमा झालेला आहे.

स-न २००४-२००५ पासून बँकेने स्वयंसहाय्यता गट बँक जोडणीद्वारे कर्ज वाटपाचे प्रभावीपणे ज ाम जे ले-ने स-न २००५-२००६ सालासाठी नाबार्डमार्फत राज्य पातळीवर जिल्हा सहकारी बँक विभागामध्ये "तृतीय" क्रमांकाचा तसेच सन २००६-२००७ या वर्षातील "द्वितीय" क्रमांकाचा "बेस्ट परफॉरमन्स" अवार्ड मिळाला आहे.

स-न २००७-२००८ सालासाठी नाबार्डने ४५०० गटांचे बँक जोडणीचे उद्दीष्ट दिलेले होते. उद्दीष्टापेक्षा जास्त म्हणजे ४७३५ गटांना रु.९६३.९३ लाख मात्रचे कर्ज वाटप बँकेने पूर्ण केलेने आपले बँकेस राज्य पातळीवर सन २००७-२००८ सालच्या जिल्हा सहकारी बँक विभागांमध्ये "द्वितीय" क्रमांकाचा "बेस्ट परफॉरमन्स" अवार्ड मिळाला असून, नाबार्डने दिलेले स्वयंसहाय्यता गट बँक जोडणीचे उद्दीष्ट पूर्तता केलेली आहे.

बँकेन सन १९९९ ते दि.३०/९/२०१७ अखेर स्वयंसहाय्यता गटांना बँकेने केलेले मंजूर कर्ज, वाटप व येणेबाकी संदर्भातील माहिती सोबत जोडलेली आहे.

(रु.लाखांत)

| अ.नं. | कर्ज प्रकार | गट संख्या | कर्ज वाटप | |
|---|---|---|---|---|
| | | | गट | रक्कम |
| १ | ए.पी.एल. | २००८१ | २२२३५ | ८८३१.०२ |
| २ | बी.पी.एल. | -- | १६०५ | २३३५.२० |
| ३ | एन.आर.एल.एम. | ३४८२ | ९६६ | ११६०.५३ |
| | **एकूण -** | **२३५६३** | **२४८०६** | **१२३२६.७५** |

वरीलप्रमाणे माहिती असे...